क्रमांक : जिपगों /पसं/आस्था-१/ /२०१७
कार्यालय , जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया
दिनांक : /०२/२०१७

**प्रति,**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

**विषय :-** शासकीय कार्यालयामध्ये (अ) नागरिकांची सनद प्रसिद्ध करणे (ब) सादरीकरणाचे टप्पे कमी करणे (क) कालमर्यादेत धारीका निकाली काढणे .

**संदर्भ :-** आपले पत्र क्र.जिपगों/साप्रवि/ वशि/डे-

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित प्रपत्रत सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र : विहित प्रपत्र व नागरीकांची सनद**

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

# पशुसंवर्धन विभाग
# जिल्हा परिषद , गोंदिया

# बदल्यांचे विनियमन आणि विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

कलम ८(१) नुसार प्रसिद्ध करावयाचा नागरिकांचा जाहीरनामा ( नागरिकांची सनद)

# महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम ,२००५ मधील कलम ८(१) नुसार प्रसिध्द करावयाची माहिती.

## १) पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद गोंदियाची रचना ,कार्य व कर्तव्य.

**रचना:-** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत असलेल्या विविध विभागापैकी पशुसंवर्धन विभागातील रचना खालीलप्रमाणे आहे.

१) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवेतील वर्ग-१ चे अधिकारी असतात व ते या विभागाचे विभागप्रमुख म्हणून काम पाहतात.

२) डॉ.आर. व्ही. वासनिक हे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी या पदावर दिनांक १५.११.२०१७ पासून कार्यरत आहेत.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी व अधिकारी यांचा रचना दर्शक तक्ता खालीलप्रमाणे आहे.




**कार्य :-** या विभागातील ग्रामीण जनतेसाठी ७२ पशुवैद्यकिय दवाखान्याच्या माध्यमातनू पशुधनाच्या आरोग्य विषयक सोयी सवलती पुरविल्या जातात. तसेच विविध योजनाअंतर्गत शेतकऱ्यांना लाभ देण्यात येतो.

**कर्तव्य :-** ग्रामीण जातेच्या जनावराकरीता आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याकरीता जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे अधिनस्त खालील अधिकारी व कर्मचारी विविध कर्तव्य बजावत असतात.

१) **पशुधन विकास अधिकारी 4(विस्तार) पं.स.** :-तालुक्यातील सर्व पशुवैद्यकिय दवाखान्याच्या कामकाजावर प्रत्यक्ष पर्यवेक्षण, नियंत्रण व देखरेख ठेवणे व तसा अहवाल वेळोवेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना सादर करणे. प्रशासकीय अधिकारी म्हणुन काम करणे.

२) **पशुधन विकास अधिकारी** (दवाखाना):- पशुवैद्यकिय संस्थेत पशुरुग्ण तपासणे, विविध आजारावर औषधोपचार करणे,शस्त्रक्रिया करणेव साथरोग नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करणे व तसा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व मुख्यालयास सादर करणे.

३) **सहाय्यक पशुधन विकास अधिकारी** (दवाखाना):- पशुवैद्यकिय संस्थेत पशुरुग्ण तपासणे, विविध आजारावर औषधोपचार करणे,शस्त्रक्रिया करणे व साथरोग नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करणे व तसा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व मुख्यालयास सादर करणे.

४) **पशुधन पर्यवेक्षक** :- पशुवैद्यकिय संस्थेत पशुरुग्ण तपासणे, विविध आजारावर औषधोपचार करणे,व साथरोग नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करणे व तसा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व मुख्यालयास सादर करणे.

## अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य.

### २) अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य.

१) आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजुरी देता येईल.

२) विभाग प्रमुखाला प्रत्येक वर्षी , आपल्या विभागात काम करणा-या वर्ग -२ , ३, ४च्या सेवेतील अधिका-यांच्या व कर्मचा-यांचे कामाचे मुल्यमापन करील आणी त्याबाबदचे आपले मत गोपनियरित्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे पाठविल .

३) आजारपणामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसल्यास, तो जिल्हा परिषदेच्या व तिचा सचिव असेल अशा समितीच्या प्रत्येक सभेत उपस्थित राहील आणी त्यास, पीठासीन प्राधिका-याच्या परवानगीने ,सभेत ज्या बाबींवर चर्चा असेल तिच्या संबंधात माहीती किंवा स्पष्टीकरण देता येईल.

४)जिल्हा परिषदे अंतर्गत जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी यांचे नियंत्रणात पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचयात समिती यांचे कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था पशुसवंर्धन खात्याच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्याचे कार्य करीत आहेत.

५)जिल्हयातील पशुसंवर्धन विभागांतर्गत विषयक योजना प्रभावीपणे राबविण्याचे दृष्टीने ७१ पशुवैद्यकीय दवाखाने व १ फिरते पशुचिकीत्सालय पथक असुन जनावरांच्या आरोग्य सेवेची संधी उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

६)पशुसंवर्धन विभागामधील डावी कडवी विचार सरणी संबंधी माहिती उपलब्ध करुन देणे पशुवैद्यकीय संस्थाचे बांधकाम तसेच दुरुस्ती व पशुसेवेविषयक इतर योजना शासन अनुदानातून राबवीणे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी या कार्यालयातील कार्यासन निहाय कामकाजाचे वाटप खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यासन क्रमांक | कार्यभार |
|---|---|---|
| १ | तां-१ | विविध योजना अंतर्गत नस्ती हाताळणे.औषधी भांडार साभांळणे. |
| २ | तां-२ | विभागाअंतर्गत होणाऱ्या सर्व सभाच्या नस्ती हाताळणे,बांधकामाच्या नस्ती हाताळणे.तसेच स्थापना व दर्जावाढच्या नस्ती हाताळणे. |
| ३ | तां-३ | तांत्रिक कार्याचा अहवाल नस्ती हाताळणे,वाहन नस्ती हाताळणे. |
| ४ | अ-१ | आस्थापाविषयक कामकाजावर नियंत्रण व देखरेख, रचना व कार्यपद्धतीची अंमलबजावणी, जन माहिती अधिकारी म्हणून काम करणे, निरिक्षण टिप्पणीचे अनुपालन तयार करणे, ISO संदर्भात काम पाहणे. कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण,कर्मचाऱ्यांकडून कार्यविवरण पंजी/ बारनिशी प्राप्त करून संकलीत पंजी ठेवणे,दप्तर तपासणी, आस्थापाविषयक नस्तींची तपासणी,साप्रवि सभा व सभेची माहिती, जन माहिती अधिकारी म्हणून काम पाहणे, इतर तातडीची सर्व प्रकरणे तपासून वेळीच निकाली काढण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे. |
| ५ | अ-२ | आस्थापाना विषयक वर्ग ३ व ४ च्या नस्ती हाताळणे,सेवा जेष्टता यादया तसार करणे.सरळसेवा पदोन्नती नस्ती हाताळणे,कालबध्द,निवृत्ती वेतन नस्ती हाताळणे. लोकआयुक्त , लोकशाही दिन नस्ती हाताळणे. |
| ६ | अ-३ | कोषागार देयके तयार करणे,लेखे तयार करणे. BDS स्लीप तयार करणे ,कार्यालयीन टेलिफोन, विद्युत देयके तयार करणे, पगार देयके नस्ती हाताळणे. |
| ७ | अ-४ | आवक/जावक व वर्ग १ व २ च्या आस्थापना विषयक नस्ती हाताळणे. |

## निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली.

महत्वाच्या विषयावर, नवनविन योजनांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्या माध्यमातून निर्णय घेत असतात. पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीने सहमत केलेले ठराव, स्थायी समिती व नंतर सर्वसाधारण सभेमध्ये ठेवून त्यानुसार कार्यवाही केली जाते.

पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, स्थायी समिती व सर्वसाधारण सभा यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी करीत असतात. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक) आकस्मिक भेटी, नियोजित भेटी देवुन पर्यवेक्षण करतात.

## कामकाजाची कार्यपद्धती

कर्तव्य पार पाडण्यासाठी वेगवेगळे काम किती वेळामध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे याबाबत शासनाने दिलेल्या ि-निर्देशानुसार प्राधान्य देण्यात येते ते खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | पत्राचा प्रकार | कार्यवाही करावयाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | तात्काळ | त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी सकाळी |
| २ | तातडीची | ४ दिवसाचे आत |
| ३ | कालमर्यादीत | दिलेल्या कालमर्यादेत |
| ४ | सर्वसाधारण | कामाच्या सात दिवसात |
| ५ | एकाच विभागाने निर्णय घ्यावयाची नस्ती | ४५ दिवसांचे आत |
| ६ | अन्य विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची नस्ती | ३ महिन्यांचे आत |

## अधिकारात येणारे नियम / परिपत्रके / सूचना इत्यादी

कार्यालयातील दैनंदिन प्रशासकीय कामे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र शासनाने विषय निहाय सेवाशर्ती नियम पुस्तिका उदा. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ आणि वर्तणुक नियम १९६७ महाराष्ट्र लेखा संहीता अधिनियम १९६८ तसेच त्यातर्गत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासकीय नियमान्वये कर्मचारी आपली दैनंदिन कर्तव्य व कामे पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशिल असतात व नियमाचे आधारे कार्यवाही करण्यात येते.

## खात्याच्या अखत्यारित येणारे कागदपत्रे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम २७४ पोट कलम ८० अन्वये अभिलेखाचे वर्गीकरणानुसार रचना व कार्यपद्धती अंतर्गत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१) कार्यालयीन स्वच्छता :- कार्यालय परिसर रोज स्वच्छ करण्यात येत असते.

२) कार्यालयात बसण्याची व्यवस्था :- कार्यालयात उपलब्ध जागेनुसार बसण्याची व्यवस्था लखिना पॅटर्न प्रमाणे करण्यात आली आहे.

३) कपाट, रॅकची मांडणी :- कार्यालयातील कपाट / रॅकची मांडणी संबंधित कर्मचा-यांचे जवळ भिंती लगत करण्यात आली असुन त्यामुळे कार्यालयात उजेड राहतो व हवा खेळती राहते .

४) कामाची विभागणी :- प्रत्येक कर्मचा-यांना कामाची विभागणी करुन देण्यात आली आहे . तसेच प्रत्येकानी त्यांचेकडे असलेल्या कामाच्या सूची कपाटाच्या दर्शनी भागावर लावल्या आहेत.

५) अभिलेखाचे वर्गीकरण :- कागदपत्राचे भविष्यकालीन महत्व व उपयोगिता किती आहे व किती काळ पर्यत जमा करुन ठेवणे आवश्यक आहे याबाबतचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| **अभिलेखाचे वर्ग** | **जतन करावयाचा कालावधी** |
|---|---|
| अ | कायम |
| ब | ३० वर्षे |
| क | १० वर्षे |
| क-१ | ०५ वर्षे |
| ड | १ वर्षे किंवा त्यावर्षाचे लेखा परिक्षण होईपर्यत. |

वरील बाबीचा अवलंब केल्यामुळे कार्यालयीन कामाची गती वाढविण्यास मदत होते.

# विभागामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हयाचे नियोजन समितीकडे प्रस्तावित केलेल्या मूलभूत सुविधा तसेच वैयक्तीक लांभाच्या योजनांना जिल्हा नियोजन मंडळांची मान्यता घेवून सर्वसाधारण तसेच अनुसुचीत जाती / जमातीच्या लाभधारकांचे उत्पन्नात वाढ होवून त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी शासनाकडून अनुदानावर वैयक्तीक लाभांच्या योजना राबविण्यांत येत आहे. अनुदानाच्या रक्कमेची तरतूद बिगर आदीवासी योजना, विशेष घटक योजना, आदीवासी उपयोजना आणि आदीवासी क्षेत्राबाहेरील योजनेमध्ये शासनाकडून उपलब्ध होत असते. उपलब्ध तरतूदीमधून शासन मजुंरी प्राप्त योजना राबविण्यांत येत असून त्यापैकी यशस्वीरित्या राबविण्यांत आलेल्या आणि प्रत्यक्षात लाभधारकांना झालेल्या लांभाच्या योजनांची माहिती खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

**1) तंलगाचे गट वाटप-**

तलंगाचे गट वाटप योजना ही आदीवासी प्रवर्गातील लाभधारकासाठी असून 50%अनुदानावर राबविण्यांत येते.यामध्ये 8 ते 10 आठवडयातील विविध जातीच्या कोंबडयांचे 25 मादी व 3 नर या प्रमाणे वाटप करण्यांत येते. पूर्णगटाची किंमत रू. 6000/- असून त्यापैकी 50% अनुदानाच रक्कमे मध्ये पक्षांची किंमत, वाहतूक खर्च, ओषधी व खाद्याचा समावेश आहे.तसेच लाभार्थी हिस्सामध्ये पंक्षाकरिता खाद्य, भांडी, निवारा या करिता खचाचा समावेश आहे.या योजनेद्वारे लाभधारकांसाठी अंडी, मास इत्यादी भरपूर प्रमाणात खाण्यासाठी उपलब्ध होत असते.

**2) विशेष घटक योजना-शेळयाचे गट वाटप-**

सदर योजनेअंतर्गत 75% अनुदान व 25% वित्तिय संस्थाचे कर्ज किंवा लाभार्थी हिस्सा या प्रमाणे राबविण्यांत येत असून 10 शेळया व 1 बोकड या प्रमाणे गट अनुसुचीत जमातीच्या लाभार्थीना वाटप करण्यांत येते. नाबार्डने ठरवून दिलेल्या 10 शेळया व 1 बोंकड या एका गटाची किंमत रू.45,000/- इतकी असून तिन वर्षाचा विमा रू.2848/- याप्रमाणे एका गटाची पूर्ण किंमत रू.47,848/- होते. सदर योजना अनुसुचीत / जमातीचे लाभार्थीना त्याचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी अतिशय फायदेशीर व यशस्वी ठरलेली आहे. तसेच सदर योजनेव्दारे बेरोजगारांना पुरक व्यवसाय उपलबध झालेला आहे.

**3) आदिवासी क्षेत्र उपयोजना-शेळयाचे गट वाटप-**

सदर योजनेअंतर्गत 75% अनुदान व 25% वित्तिय संस्थाचे कर्ज किंवा लाभार्थी हिस्सा या प्रमाणे राबविण्यांत येत असून 10 शेळया व 1 बोकड या प्रमाणे गट अनुसुचीत जमातीच्या लाभार्थीना वाटप करण्यांत येते. नाबार्डने ठरवून दिलेल्या 10 शेळया व 1 बोंकड या एका गटाची किंमत रू.45,000/- इतकी असून तिन वर्षाचा विमा रू.2848/- याप्रमाणे एका गटाची पूर्ण किंमत रू.47,848/- होते. सदर योजना अनुसुचीत / जमातीचे लाभार्थीना त्याचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी अतिशय फायदेशीर व यशस्वी ठरलेली आहे. तसेच सदर योजनेव्दारे बेरोजगारांना पुरक व्यवसाय उपलबध झालेला आहे.

4) **विशेष घटक योजना- दुधाळ जनावरांचे वाटप**

सदर योजना अनुसुचीत जाती/ जमातीसाठी 75% अनुदान आणि 25% लाभार्थी हिस्सा अथवा बॅकेचे कर्ज या प्रमाणे दुधात असलेल्या 2 गायी / म्हशी च्या गटाचे वाटप करण्यांत येत असुन प्रथम जनावर लाभार्थीना दिल्यानंतर 6 महिनेच्या अंतराने दुसरे जनावरांचे वाटप करण्यांत येते. लाभधारकांची निवड दुध संकलन मार्गावरील दारिद्ररेषेखालील लाभार्थींची करावयाची असुन सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कमीत-कमी 10 लाभधारक असावेत, त्यामूळे संकलन झालेले दुध, दुध संकलन केंद्रावर विक्री करणे शक्य होवू शकेल. सदर योजनेअंतर्गत नाबार्ड चे ठरवून दिलेल्या दरानुसार प्रति संकरीत गायींची किंमत रू.40,000/- व म्हशीची किंमत रू.40,000/- आहे.दोन जनावराकरीता रू.80000/- व गटातील जनावरांच्या विम्याची रक्कम रू.5061/- अशाप्रकारे एकुण गटाची रक्कम रू.85061/-आहे. सदर योजना या विभागामार्फत यशस्वीरित्या राबविण्यांत येणार आहे.त्यामळे लाभधारकांकउे दुधाचे उत्पादनात वाढ होवून त्यांचे उत्पन्नामध्ये आर्थिक भर पडल्याने त्यांचे राहणीमान उंचावले आहे. विशेष घटक योजनेमध्ये 2 दुधाळ गायीचे अथवा म्हशीचे गट वाटप करण्यास या योजनेस मान्यता प्राप्त झाली आहे.

5) **विशेष घटक योजना -दुधाळ जनावरांना खाद्य वाटप**

सदर योजना 100% अनुदानावर अनुसुचीत जाती / जमाती व नवबौध्द लाभधारकासाठी राबविण्यांत आलेली आहे. या योजनेअंतर्गत जनावरांचे दोन वेतामधील भाकड कालावधीसाठी प्रत्येक म्हशीसाठी 225 कि.व गायीसाठी 150 कि. पशुखाद्य आणि गाभण काळाच्या शेवटच्या 2 महिन्यासाठी प्रत्येक गायी / म्हशीकरिता सरासरी 90 कि. अतिरिक्त खाद्य पुरविण्यांत येते, या सोबत लाळया खुरकूत रोगाची लस, क्षार मिश्रण व कृमिनाशक औषधी बिनामुल्य पुरविण्यांत येते.या योजनेमूळे दुधाळ जनावरांना शासनाकडून 100% अनुदानावर समतोल आहार उपलब्ध होत असल्यामूहे नियोजित वेळी गायी / म्हशी माजावर येत असतात. त्यामूळे शेतक-यांना जनावरांचे आहारावरील खर्चात बचत होते. तसेच दुध उत्परदनात वाढ झाल्यामूळे त्यांचे आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडते.

6) **संकरीत कालवडी/ सुधारीत जातीच्या म्हशीच्या पारडयांना खाद्य अनुदान**

सदर योजना विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम अंतर्गत राबविण्यांत येत असुन समाजातील दुर्बल घटकांना जसे अल्पभुधारक, अत्यल्प भुधारक, व शेतमजुर यासाठी असून त्यांना पशुउत्पादन कार्यक्रमात सहभागी करून घेवून या कार्यक्रमाव्दारे त्यांना उत्पन्नाचे साधन निर्माण करून देण्यासाठी त्यांचेकडे हयात असलेल्या संकरीत कालवडीना त्याच्या वयाच्या 4 च्या महिण्यातून 32 महिण्यापर्यंत तसेच सुधारीत जातीच्या पारडयांना 4थ्या महिण्यापर्यंत 40 महिण्यापर्यंत म्हणजे वेत होईपर्यंत पशुखाद्यासाठी अल्प व अत्यल्प भुधारकांना 50% व भुमीहीन शेतमजुरासाठी 66.66% अनुदानावर साधारणत:1900 कि. खाद्य (कॉफ रेशन)रूपाने अनुदान देण्यांत येते. योजनेमध्ये समाविष्ठ झालेले लाभधारकांना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षणासाठी अनुदान रूपात रू. 100/- देण्यांत येते.प्रचलीत किंमतीनुसार वासरांच्या संगोपनासाठी पशुखाद्य, विमा,लस, जंतनाशके औषधी इत्यादी खर्च अल्प/ अत्यल्प भुधारकांना रूये 6000/-व शेतमजूर यांना रू.8000/- अनुदान रूपात देण्यांत येते.तसेच या योजनेमध्ये नियमीत पशुखाद्य मिळत असल्यामूळे व विहित वेळी कालवडी/ पारडयांना माजावर येत असून त्यांचे प्रजनन क्षमतेत वाढ झाल्यामूळे विहित काळात माजावर येत असतात.

**7) कामधेनु दत्तक ग्राम योजना-**

सन 2011-12 या वित्तिय वर्षापासुन ही योजना रबविण्यात येत असुन या योजनेअंतर्गत जनावरांना जंतनाशक औषधी पाजने,गोचिड-गोमाशा निर्मुलन कार्यक्रम, निकृष्ठ चारा सकस करण्यासाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन, दुग्ध स्पर्धांचे आयोजन, लसीकरण शिबिर, वंधत्व निवारण शिबिरे, रक्त जल व रोग तपासणी इ. कार्यक्रम एकत्रितरित्या दत्तक गावामध्ये मोहिम स्वरूपात जिल्हयात रागविण्यात येणार आहे.कामधेनु दत्तक ग्रामासाठी निवड झालेल्या एका गावाकरीता रू.1,52,500/-च्या मर्यादेत विविध बाबीवर खर्च करावयाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | जंतनाशक शिबिर | रु.17,500/- |
| 2) | खनिजद्रव्य मिश्रण व जिवनसत्व पुरवठा | रु.1,00,000/- |
| 3) | गोचिड गोमाशा निर्मुलन शिबिर | रु.15,000/- |
| 4) | वंधत्व निवारण शिबिर | रु.15,000/- |
| 5) | प्रशिध्दी व प्रचार | रु.5,000/- |
| | **एकुण** | **रु.1,52,500/-** |

**8) विशेष घटक योजना अंतर्गत शेतकऱ्यांना प्रशिक्षण**

जिल्हयातील अनुसुचित जातीच्या गोपालक शेतकऱ्यांना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण व दुग्धव्यवसायासंबधी मार्गदर्शन देण्याकरीता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येते.तज्ञ प्रशिक्षकाकडुन शेतकरी गोपालकांना निशुल्क प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येतो.

9) **आदिवासी क्षेत्र उपयोजना- दुधाळ जनावरांचे वाटप**

सदर योजना अनुसुचीत जमातीसाठी 75% अनुदान आणि 25% लाभार्थी हिस्सा अथवा बॅकेचे कर्ज या प्रमाणे दुधात असलेल्या 2 गायी / म्हशी च्या गटाचे वाटप करण्यांत येत असुन प्रथम जनावर लाभार्थीना दिल्यानंतर 6 महिनेच्या अंतराने दुसरे जनावरांचे वाटप करण्यांत येते. लाभधारकांची निवड दुध संकलन मार्गावरील दारिद्ररेषेखालील लाभार्थींची करावयाची असुन सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कमीत-कमी 10 लाभधारक असावेत, त्यामूळे संकलन झालेले दुध, दुध संकलन केंद्रावर विक्री करणे शक्य होवू शकेल. सदर योजनेअंतर्गत नाबार्ड चे ठरवून दिलेल्या दरानुसार प्रति संकरीत गायींची किंमत रू.40,000/- व म्हशीची किंमत रू.40,000/- आहे.दोन जनावराकरीता रू.80000/- व गटातील जनावरांच्या विम्याची रक्कम रू.5061/- अशाप्रकारे एकुण गटाची रक्कम रू.85061/-आहे. सदर योजना या विभागामार्फत यशस्वीरित्या राबविण्यांत येणार आहे.त्यामळे लाभधारकांकउे दुधाचे उत्पादनात वाढ होवून त्यांचे उत्पन्नामध्ये आर्थिक भर पडल्याने त्यांचे राहणीमान उंचावले आहे. सदर योजनेमध्ये 2 दुधाळ गायीचे अथवा म्हशीचे गट वाटप करण्यास या योजनेस मान्यता प्राप्त झाली आहे.

10) **आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना- दुधाळ जनावरांचे वाटप**

सदर योजना अनुसुचीत जमातीसाठी 75% अनुदान आणि 25% लाभार्थी हिस्सा अथवा बॅकेचे कर्ज या प्रमाणे दुधात असलेल्या 2 गायी / म्हशी च्या गटाचे वाटप करण्यांत येत असुन प्रथम जनावर लाभार्थीना दिल्यानंतर 6 महिनेच्या अंतराने दुसरे जनावरांचे वाटप करण्यांत येते. लाभधारकांची निवड दुध संकलन मार्गावरील दारिद्ररेषेखालील लाभार्थींची करावयाची असुन सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कमीत-कमी 10 लाभधारक असावेत, त्यामूळे संकलन झालेले दुध, दुध संकलन केंद्रावर विक्री करणे शक्य होवू शकेल. सदर योजनेअंतर्गत नाबार्ड चे ठरवून दिलेल्या दरानुसार प्रति संकरीत गायींची किंमत रू.40,000/- व म्हशीची किंमत रू.40,000/- आहे.दोन जनावराकरीता रू.80000/- व गटातील जनावरांच्या विम्याची रक्कम रू.5061/- अशाप्रकारे एकुण गटाची रक्कम रू.85061/-आहे. सदर योजना या विभागामार्फत यशस्वीरित्या राबविण्यांत येणार आहे.त्यामळे लाभधारकांकउे दुधाचे उत्पादनात वाढ होवून त्यांचे उत्पन्नामध्ये आर्थिक भर पडल्याने त्यांचे राहणीमान उंचावले आहे. सदर योजनेमध्ये 2 दुधाळ गायीचे अथवा म्हशीचे गट वाटप करण्यास या योजनेस मान्यता प्राप्त झाली आहे.

**11) <u>आदिवासी क्षेत्राबाहेरी योजना-शेळयाचे गट वाटप</u>** 8

सदर योजनेअंतर्गत 75% अनुदान व 25% वित्तिय संस्थाचे कर्ज किंवा लाभार्थी हिस्सा या प्रमाणे राबविण्यांत येत असून 10 शेळया व 1 बोकड या प्रमाणे गट अनुसुचीत जमातीच्या लाभार्थींना वाटप करण्यांत येते. नाबार्डने ठरवून दिलेल्या 10 शेळया व 1 बोंकड या एका गटाची किंमत रू.45,000/- इतकी असून तिन वर्षाचा विमा रू.2848/- याप्रमाणे एका गटाची पूर्ण किंमत रू.47,848/- होते. सदर योजना अनुसुचीत / जमातीचे लाभार्थींना त्याचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी अतिशय फायदेशीर व यशस्वी ठरलेली आहे. तसेच सदर योजनेव्दारे बेरोजगारांना पुरक व्यवसाय उपलबध झालेला आहे.

**12) <u>बिगर आदिवासी योजना - एकदिवसीय कुक्कुट पिल्लांचे गट वाटप</u>**

एकदिवसीय कुक्कुट पिल्लांचे गट वाटप योजना ही सर्वसामान्य लाभधारकासाठी असून 50%अनुदानावर राबविण्यांत येते.यामध्ये एकदिवसीय सुधारीत कुक्कुट पिल्लांचे गट (100 पिल्ले) या प्रमाणे वाटप करण्यांत येते. पूर्णगटाची किंमत रू. 16000/- असून त्यापैकी 50% अनुदान रक्कमे मध्ये पक्षांची किंमत, खाद्याचा समावेश आहे.तसेच लाभार्थी हिस्सामध्ये पक्ष्याकरिता भांडी, निवारा,वाहतुक खर्च व औषधी या करिता खर्चाचा समावेश आहे.या योजनेद्वारे लाभधारकांसाठी अंडी, मास इत्यादी भरपूर प्रमाणात खाण्यासाठी उपलब्ध होत असते.

**13) <u>जिल्हा स्तरावर संकरीत वासरांचा मेळावा व जनावरांची प्रदर्शनी,उत्तेजनार्थ बक्षिसे देणे व उत्कृष्ट गोपालकांचा सपत्निक सत्कार करणे</u>**

जिल्हा परिषद राजस्व निधीतुन ही योजना कार्यान्वित करण्यात येत असुन जिल्हयातील शेतकऱ्यामध्ये दुग्धव्यवसायकडे विशेष कल निर्माण करण्याकरीता या योजनेचा मोलाचा वाटा आहे.या कार्यक्रमातुन उत्कृष्ट गोपालकांना सपत्निक प्रोत्साहनपर बक्षिसे देवुन सत्कार करण्यात येतो.

**<u>गोंदिया जिल्हयातील दुग्ध सहकारी संस्थांची माहिती</u>**

अ) जिल्हयातील एकूण कार्यरत संस्था-- 144 ब) अवसायनातदुग्ध संस्था-------------222
क)एकूण संस्था--------------------- 366

**<u>गोंदिया जिल्हयात खालीलप्रमाणे दुध संकलन होतो.</u>**

| | | |
|---|---|---|
| **1)शासकिय संस्था** | **3962** | लिटर /प्रति दिवस |
| **2)खाजगी संस्था** | **32952** | लिटर /प्रति दिवस |
| **एकुण** | **36914** | लिटर/प्रति दिवस |

**गोंदिया जिल्हयातील दुग्ध शितकरण प्रकल्पाची माहिती गोंदिया जिल्हयात खालील ठिकाणी शितकरण प्रकल्प आहेत.**

1) सातगांव ता- आमगांव 2.कोहमारा ता- सडक अर्जुनी

## <u>गोंदिया जिल्हयातील बैलबाजार भरण्यांत येत असलेल्या गावांची माहिती.</u>

| अ.क्र | बैल बाजार भरत असलेल्या गांवाचे नांव/ पत्ता | नगरपरिषद अंतर्गत/ ग्राम पंचायत अंतर्गत | बैल बाजार भरत असलेला दिवस |
|---|---|---|---|
| 1 | गोंदिया, त- गोंदिया, जि- गोंदिया | नगरपरिषद अंतर्गत | सोमवार |
| 2 | गोंरेगांव , त- गोंरेगांव , जि- गोंदिया | ग्राम पंचायत अंतर्गत | बुधवार |
| 3 | काटी, त- गोंदिया , जि- गोंदिया | ग्राम पंचायत अंतर्गत | रविवार |
| 4 | आमगांव ,त- गोंदिया , जि- गोंदिया | ग्राम पंचायत अंतर्गत | शुक्रवार, शनिवार |
| 5 | देवरी , ता. देवरी , जि गोंदिया | ग्राम पंचायतअंतर्गत | मंगळवार |

<u>**गोंदिया जिल्हयातील कुक्कूट पालन सहकारी संस्थेची माहिती**</u>

गोंदिया जिल्हयात मौजा- करटी ,(भुराटोला) त- तिरोडा जि- गोंदिया येथे राष्ट्रीय सहकार विकास निगम दिल्ली अंतर्गत मेसर्स , दिपा कुक्कूट पालन केंद्राची स्थापना पत्र क्र .NCDC .Poultry sanction New Delhi No.1 /20/91 Poultry (108)Dt.7/12/1993 अन्वये झालेली आहे. सदर संस्थेचे अध्यक्ष श्री. हरीश उंकउराव मोरे आहेत. संस्थेला खालील प्रमाणे आर्थिक सहाय्य शासनाकडून प्राप्त झाली.

पहिला हप्ता . 18 मे 1994 रू. 28.00/- लाख
दुसरा हप्ता. 6 एप्रिल 1996 रू.36.00/- लाख
तिसरा हप्ता .27 मार्च 1998 रू.21.50/- लाख

एकूण- रू.85.50/- लाख

दिपा कुक्कूट पालन संस्था करटी येथे सद्या स्थितीत खालील प्रमाणे पक्षी आहेत.
1)लेअर पक्षी- 00 पक्षी (W L H) 2) ग्रोअर पक्षी- 3) चिक्स - 00 पक्षी
सद्या मासीक अंडी उत्पादन 00

| अ क्र | संस्थेचे नांव | संस्थेस दिलेले अर्थ सहाय्य | | | संस्थेकडून झालेली वसूली | | | | संस्थेकडेअसलेली थकबाकी | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज | भाग-भांडवल | एकूण | कर्ज | व्याज | दंड व्याज | एकूण | कर्ज | व्याज | दंड व्याज | एकूण | |
| 1 | मे.दिपा कुक्कूट पालन सहकारी संस्था करटी ता. तिरोडा जि- गोंदिया | **45.00** | **40.50** | **85.50** | **1.26** | **3.75** | **-** | **5.01** | **43.74** | **177.98** | **39.49** | **261.21** | **(रूपये लाखात)** |

<u>**गोंदिया जिल्हयातील गोशाळाची माहिती**</u>

| अ.क्र | संस्थेचे/मालकाचे नांव व पत्ता /दूरध्वनी क्रंमाक | पशुधनाचा प्रकार | पशुधनाची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीकृष्ण गोरक्षण सभा गोंदिया<br>(रजि न. १८२ स्थापना सन १९१६) | जर्सी<br>गावठी (देशी) | 185<br>117 | एकुण<br>302 |

<u>**पशुसंवर्धन विभाग जि.प.गोंदिया अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची सद्यस्थिती**</u>

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | मंजुर पदांची संख्या | भरलेले पदांची संख्या | **रिक्त पदांची संख्या** |
|---|---|---|---|---|
| 1 | पशुधन विकास अधिकारी | 49 | 27 | **22** |
| 2 | सहा.पशुधन विकास अधिकारी | 09 | 13 | **अतिरीक्त-04** |
| 3 | पशुधन पर्यवेक्षक | 40 | 35 | **05** |
| 4 | पट्टिबंधक | 34 | 29 | **05** |
| 5 | परिचर | 88 | 87 | **01** |

<u>**प्रशासकीय कामाचा दृष्टीकोन व नीती निर्धारण संबंधाचे सर्व सामान्यांचे परामर्शकरीता करण्यात आलेली व्यवस्था**</u>

जिल्हयाचे ग्रामीण भागामधून पशुसंवर्धन विषयक सेवेबाबत तसेच विभागाच्या विविध योजनासंबधात वेगवेगळया समस्या घेवनू येणा-या नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याकरीता तक्रार निवारण कक्ष तयार करण्यात आले आहे.तसेच सहाय्यक जन माहीती अधिकारी / जनमाहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेद्वारे विभागातील कामाची माहीती देण्यात येत असते.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

**अ) नागरीकांची सनद प्रसिध्द करणे**

| विभागाचे नाव | अधिनस्त कार्यालयाची संख्या | यापैकी किती कार्यालयानी नागरीकाची सनद प्रसिध्द केली त्यांची संख्या | ज्या कार्यालयानी नागरीकाची सनद प्रसिध्द केली नाही त्यांची संख्या | नागरीकांची सनद प्रसिध्द न करण्या-या अधिकारी /कर्मचारी यांचे विरुध्द केलेली शिस्तभंगाची कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पशुसंवर्धन विभाग जि.प.गोंदिया | ८ | ८ | निरंक | निरंक |

**ब) सादरीकरणाचे टप्पे कमी करणे, अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे**

| विभागाचे नाव | विभाग खुदद मध्ये अधिकारांचे विकेंद्रीकरण व सादरीकरणाचे टप्पे कमी आहेत काय | किती अधिनस्थ कार्यालयातील सदर कार्यवाही करण्यात आली त्याची संख्या | किती कार्यालयात अशी कार्यवाही करण्यात आली नाही त्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| पशुसंवर्धन विभाग जि.प.गोंदिया | होय | ८ | निरंक |

**क) धारीका निकाली काढण्यासाठी निश्चित केलेल्या कालमर्यादेत काढणे व या कालमर्यादेचे पालन न झाल्यास शिस्त भंगाची कार्यवाही करणे**

| अ.क्र. | शासकिय अधिकारी /कर्मचा-यांचे नाव | विभाग /कार्यालयाचे नाव | करण्यात आलेली कारवाई |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | निरंक | निरंक | निरंक |

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, गोंदिया**